॥ ॐ ॥

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

सप्टेंबर २०२३

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.
(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४     भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६
Email : wardhinee@gmail.com
Website : http://www.swaroopwardhinee.org



प्रारंभी विनंती करू गणपति
विद्यादयासागरा ।
अज्ञानत्व हरूनि बुद्धिमति दे
आराध्य मोरेश्वरा ॥
चिंता, क्लेश, दारिद्र्य,
दुःख अवघे देशांतरा पाठवी ।
हेरंबा, गणनायका, गजमुखा
भक्ता बहु तोषवी ॥

## गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा...

# समुपदेशन विभाग

जुलै महिन्यात वर्धिनीच्या सर्व शाखांमधील निवड प्रक्रियेसाठी २८ शाळांमधून ३००० पेक्षा जास्त मुलांची बुद्धिमापन चाचणी झाली. या परीक्षेत १२०० मुलं उत्तीर्ण झाली. सर्व मुलांशी शाखेतील युवक संपर्क करीत आहेत.

◆ **व्याख्यान –** दिनांक १ सप्टेंबरला कन्या शाळा, भवानी पेठ येथे ९ वी व १० वीच्या मुलींसाठी 'किशोरवयीन समस्या' या विषयावर सौ. मेघा नगरे यांचे व्याख्यान झाले. दीडशे मुली उपस्थित होत्या. सत्राच्या सुरुवातीला गोष्टीतून प्रत्येकाच्या मनाचे, अंतर्मनाचे सौंदर्य बाह्य सौंदर्यापेक्षा महत्त्वाचे असते हे गोष्टीतून स्पष्ट केले. त्यानंतर त्यांनी किशोरवयातील बदलांना सामोरे जाताना कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत हे सांगितले. । आपण ठरवलेले ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्नांमध्ये सातत्य असले की यश मिळतेच.।परिस्थिती बिकट असली तरी शिक्षणाचा मार्ग न सोडता ध्येय गाठले पाहिजे. । आपल्या आई-वडिलांसोबत, घरातल्या माणसांबरोबर मोकळेपणाने बोलत रहा. । वयात येताना आपल्या मध्ये मानसिक, शारीरिक बदल होत असतात, त्यांना सकारात्मक विचारांनी सामोरे जायला पाहिजे.।प्रसारमाध्यमांचा तसेच मोबाईलचा वापर योग्य प्रमाणात करायला हवा.

◆ **पालक सभा –** विवेकानंद शाखेत पहिली ते चौथीच्या मुलांसाठी प्रयत्न शाखा सुरू आहे. या मुलांच्या पालकांसाठी झालेल्या सभेत सौ. मेघाताई नागरे यांनी पालकांचे मुलांशी नाते कसे असले पाहिजे याबद्दल मार्गदर्शन केले.





# पाकोळी बालवाडी



श्रावण महिन्यातील सर्व सण उत्साहात साजरे झाले.

◆ **श्रावणी शुक्रवार –** सर्व गटात जिवती देवीची पूजा मांडून मुलांना गोष्ट सांगून प्रसाद दिला. छोट्या गटात शेवटच्या शुक्रवारी सरस्वती-लक्ष्मी-दुर्गा या देवींच्या वेशभूषा





करून तीन मुली आल्या होत्या. प्रत्येक देवीचे पूजन कधी होते याची माहिती ताईंनी मुलांना सांगितली.





◆ **नागपंचमी –** मोठ्या गटातील मुलांनी मातीचे वारुळ बनवण्याचा आनंद घेतला. सर्वांनी त्याच्याभोवती फेर धरून नागोबाचे

गाणे म्हटले. त्याची पूजा केली. ताईंबरोबर मुलांनी फुगड्या, झिम्मा खेळल्या.










◆ **रक्षाबंधन –** सर्व गटातील मुलांना ताईंनी राख्या बांधल्या. मधल्या गटातील मुलांनी 'नवी नवी छान मी साडी नेसणार' या गाण्यावर तर मोठ्या गटातील मुलांनी कोळी गीतावर नृत्य केले. मोठ्या गटातील मुलांनी परिसरातील झाडांना राख्या बांधून रक्षाबंधन साजरे केले. या राख्या मुलांनी ताईंच्या मार्गदर्शनाखाली वर्गात बनवल्या होत्या.







◆ **१५ ऑगस्ट –** स्वातंत्र्यदिनी झेंडावंदनाला श्री. विद्याधर नारायण शुक्ल, निवृत्त उपसंचालक, राज्य शिक्षण संशोधन परिषद, पुणे हे उपस्थित होते. छोटी मुले क्रांतिकारक, नेते यांच्या वेशभूषेत आली होती. त्यांनी दिलेल्या घोषणांमध्ये सर्वजण सहभागी झाले. वर्गातील शिक्षकांनी महाराष्ट्र गीत सादर केले.

◆ **आरोग्य तपासणी –**
दि. २२ ऑगस्टला सर्व मुलांची शारदा शक्ती या संस्थेच्या डॉक्टरांच्या सहकार्याने शारीरिक तपासणी झाली. डॉक्टरांनी विचारलेल्या प्रश्नांना मुले न घाबरता उत्तरे देत होती.





## रुग्ण सहाय्यक वर्ग

दि. १४ ऑगस्टला २०२२-२३ च्या पुणे व माले वर्गाचा प्रशस्तीपत्रक वितरण कार्यक्रम डॉ. नीता मंडलेचा यांच्या उपस्थितीत झाला. कार्यक्रमाला टाटा पॉवरच्या अधिकारी सौ. कल्पनाताई हबडे व वर्धिनीचे श्री. विश्वास कुलकर्णी, श्रीमती पुष्पाताई नडे व मंजुषा कुलकर्णी उपस्थित होते. मुलींनी मनोगतातून वर्षभर झालेल्या विविध उपक्रमांचे व रुग्णालयातील कामांचे अनुभव सांगितले. डॉक्टरांनी मुलींना मार्गदर्शन करताना शिकत असताना दवाखान्यातील कामाचे महत्त्व काय असते हे स्पष्ट केले. तसेच यापुढेही मिळालेल्या प्रत्येक संधीचा उपयोग स्वत:चे ज्ञान वाढवण्यासाठी करीत रहा हे सांगितले. पाहुण्यांच्या हस्ते सर्व

मुलींना प्रशस्तीपत्रकाचे वितरण झाले.

◆ **बक्षीस प्राप्त मुली –** विभागातून प्रथम – माले – तन्वी सुतार, पुणे – अरुणा घोरपडे, चऱ्होली – सुवर्णा गायकवाड

विषयानुसार प्रथम – प्रसुतीशास्त्र – मानसी भोसले, शरीरशास्त्र – स्नेहा कांबळे, आरोग्य संवर्धन – प्रणाली आंबेकर

◆ **आदर्श विद्यार्थिनी –** पुणे – अश्विनी लोहार, माले – मीरा भोंडणे

◆ **उत्तेजनार्थ –** पुणे – शरीफा सय्यद, माले – दिया भुवड









◆ **पुणे वर्ग –** स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात मुलींनी देशभक्तीपर गाण्यावर नृत्य सादर केले. रक्षाबंधनच्या दिवशी सर्वजणी पुणे रेल्वे स्टेशनवरील रेल्वे इंजिन चालकांना राखी बांधण्यासाठी गेल्या होत्या. हजारो प्रवाशांना इच्छुक स्थळी पोचवून त्यांचा प्रवास सुखकर करणाऱ्या या 'चक्रधर स्वामीं'च्या रोजच्या कामाची ओळख मुलींना झाली. काही मुलींनी पहिल्यांदाच रेल्वे स्टेशन पाहिले. या सर्वांचे रक्षाबंधन घरी होत नाही, त्यामुळे मुलींनी राखी बांधल्यावर सण साजरा झाल्याचा आनंद सर्वांना मिळाला.

◆ **माले वर्ग –** दि. ११ ऑगस्ट जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्त टाटा पॉवर सामाजिक विकास संस्था, मुळशी आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या कार्यक्रमात मुली सहभागी झाल्या. सिम्बॉयसिस हॉस्पिटलमधील डॉक्टर व महिला बाल विकास अधिकारी यांनी मुलींना पीपीटीद्वारे स्तनपानाचे महत्त्व व फायदे सांगितले. काम करताना संपर्कात येणाऱ्या गरोदर मातांना समजून सांगण्यासाठी मुलींना मार्गदर्शन मिळाले. स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमासाठी मुली जिल्हा परिषदेच्या शाळेत सहभागी झाल्या. तेथे त्यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. रक्षाबंधनाच्या दिवशी परिसरातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जाऊन मुलींनी तेथील डॉक्टर, स्टाफ, पेशंट व आय.टी.आय.मधील विद्यार्थी यांना राख्या बांधल्या. सुरक्षारक्षकांना राख्या बांधल्यावर त्यांना खूपच आनंद झाला.











# शाखा विभाग



◆ **पालकसभा** – शंभूराजे शाखेत युवक कार्यकर्ते श्री. मंदार पोफळे व स्वामी योगानंद शाखेत श्री. रोहित धायरकर यांनी वर्धिनीचे महत्त्व, वर्धकांच्या विकासासाठी घेतले जाणारे उपक्रम, शाखेत चालणारे दैनंदिन उपक्रम यांची माहिती सर्व पालकांना सांगितली. दृक्श्राव्य माध्यमातून (PPT) मधून शाखेच्या सहली व इतर कार्यक्रम पालकांसमोर मांडले.



◆ **स्वातंत्र्यदिन कार्यक्रम** –
स्वामी विवेकानंद शाखेत वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. अरविंद केळकर यांनी स्वातंत्र्यदिनाची व राष्ट्रीय ध्वजाची सविस्तर माहिती सांगितली. स्वातंत्र्यासाठी लढलेल्या भगतसिंगांच्या बालवयातील कथा मुलांना



सांगितल्या. यातून आजच्या परिस्थितीत युवकांनी देशासाठी काय केले पाहिजे हे विविध संकल्पनांतून स्पष्ट केले. आपले 'आवडते क्रांतिकारक' व 'स्वातंत्र्यदिनाची माहिती' या विषयांवर झालेल्या निबंध स्पर्धांचे बक्षीस वितरण त्यांच्या हस्ते झाले. बक्षीस प्राप्त मुले – लहान गट – सुंदरम शिकवा, मोठा गट – यश पवार

धर्मवीर शंभुराजे शाखेत शाखेतील वर्धक कात्रज तलावाजवळील बागेत झेंडावंदनासाठी गेले होते. तेव्हा ध्वजाजवळच्या चौथऱ्याच्या बाजूला कचरा विखुरलेला दिसला. तेव्हा तो सर्व परिसर मुलांनी स्वच्छ करून मगच ध्वजाला मानवंदना दिली.

◆ **स्वामी शिवानंद शाखा** – शाखेतले युवक व वर्धक यांनी बालगंधर्व कलादालन येथे भरलेल्या 'मराठ्यांचे शस्त्रागार' प्रदर्शनाला भेट दिली. जुनी शस्त्रास्त्रे बघताना मुलांच्या डोळ्यासमोर इतिहासातील काही प्रसंग उभे राहिले.

◆ **स्वामी ब्रह्मानंद शाखा** – शाखेच्या परिसरात संपर्क वाढावा, नवीन व्यक्ती कामाशी जोडल्या जाव्यात या उद्देशाने विक्रम मित्रमंडळात शिववंदना झाली. श्री. शरद जगताप यांच्या हस्ते आरती झाली.

◆ **स्वामी अखंडानंद शाखा** –
शाखेत दि. १ जुलैला पावनखिंड व अफझलखानाचा वध या दोन प्रसंगाचा इतिहास मुलांना सांगितला व त्यानंतर गटशः याच प्रसंगांवर आधारित प्रसंग नाट्य स्पर्धा झाली. मुलांनी कल्पकतेने उपलब्ध साधने वापरून प्रसंग सादर केले.

◆ **स्वामी सुबोधानंद शाखा** – शाखेचा ३० वा वर्धापनदिन दि. ७ ऑगस्टला श्री. विलास कुलकर्णी व श्री. निलेश



धायरकर यांच्या उपस्थितीत साजरा झाला. श्री. निलेश सरांनी वर्धिनीच्या उपक्रमांची माहिती व शाखेतून तयार झालेल्या वरिष्ठ अधिकारी व त्यांची धडपड मार्गदर्शनातून मांडली.





◆ **समर्थ रामकृष्ण शाखा** – दि. १४ ऑगस्टला शाखेत गणपती बाप्पा, जी-२० लोगो, तिरंगा, जोकर असे विषय देऊन

गटशः 'चेहरे रंगवा' (Face Painting) स्पर्धा झाली. सुरुवातीला अवघड वाटणाऱ्या स्पर्धेत प्रात्यक्षिकानंतर मुलांनी उत्साहाने भाग घेतला.



◆ **नरवीर तानाजी मालुसरे शाखा –** दि. १३ ऑगस्टला शाखेतल्या वर्धकांची पर्वतीला स्थळभेट झाली. पर्वतीवरून पुण्याचा झालेला विस्तार, पर्वतीचे पेशवेकालीन महत्त्व व शिवरायांच्या चरित्रातील प्रसंग श्री. निलेश धायरकर सरांनी मुलांना सांगितले.

◆ **राजर्षी शाहू शाखा –** शाखेत झालेल्या वक्तृत्व स्पर्धेचा बक्षीस समारंभ युवक कार्यकर्ते श्री. सौरभ वीरकर यांच्या हस्ते झाला. बक्षीस प्राप्त मुले – लहान गट – अंश कांबळे, विषय – चंद्रशेखर आझाद, मोठा गट – हेमंत सिंग, विषय – लो. टिळक (प्रथम क्रमांक) तुषार दळवे – स्वातंत्र्यवीर सावरकर (द्वितीय क्रमांक) अंदाज गायकवाड – आजच्या युगातील क्रांतिकारक (तृतीय क्रमांक).

◆ **स्वामी श्रद्धानंद शाखा –** शाखेत दर महिन्यात होणाऱ्या 'क्षणभर गप्पा' कार्यक्रमात दोन सत्रे झाली. युवा कार्यकर्ता श्री. प्रसाद दासरी याने 'पर्यावरण जपताना' हा विषय मांडताना 'तीन आर' सांगितले. १) R - Reduce - प्लास्टिकचा कमीतकमी वापर, २) R - Reuse - प्रत्येक वस्तूचा पुर्नवापर, ३) R - Recycle - प्लास्टिक, पेपर यांचा परत वापर करून नवीन गोष्टी बनवा. दुसऱ्या सत्रात श्रीमती मनिषा शिंदे यांनी वाढत्या वयात मुलांनी वावरताना घ्यायची दक्षता, आई वडिलांशी साधलेल्या संवादामुळे होणारे फायदे या विषयावर मुलांशी चर्चा केली.

◆ **सामाजिक रक्षाबंधन –** सर्व शाखांतील मुलांनी परिसरातील स्वच्छता कर्मचारी, पोलिस अधिकारी, अग्निशमन अधिकारी, बस डेपो मधील कर्मचारी यांना राखी बांधून सामाजिक रक्षाबंधन साजरे केले. धर्मवीर शंभूराजे शाखेतील वर्धक वानवडी येथील दिव्यांग कल्याणकारी संस्थेत जाऊन तिथल्या दिव्यांग मुलांना राखी बांधली. स्वामी ब्रह्मानंद शाखेतील वर्धकांनी वडगाव जवळील 'आजोळ' या शांतीवन संस्थेच्या प्रकल्पाला भेट देऊन तेथील मुलांना राखी बांधली. स्वामी सुबोधानंद शाखेतील वर्धकांनी शाखेजवळच्या निरामय फौंडेशनच्या केंद्रात जाऊन त्या सर्व मुलींकडून राख्या बांधून घेतल्या.

































वृक्षारोपण सेवा; म्हणजे
उदया' च्या 'भारताची सेवा!
शुद्ध ताजी हवा वृक्ष आम्हा देते
फळे फुले भाजी औषधे झाडापासूनी मिळते।
आपण पर्यावरणाचे घटक आहोत,
पर्यावरण जपणे म्हणजे स्वतःलाच जपणे